# सार्वजनिक वित्त – अर्थ, स्वरूप व व्याप्ती

1. संघराज्य, घटक राज्य आणि स्थानिक सरकार यांच्या उत्पन्नाची आणि खर्चाची चिकित्सा म्हणजे सार्वजनिक वित्त होय.
2. सरकारच्या वित्तीय व्यवहारांचा अभ्यास म्हणजे सार्वजनिक वित्त. यात सरकारला मिळणारे उत्पन्न व सरकारचा खर्च यांचा अभ्यास केला जातो.
3. सरकारच्या वित्तीय व्यवहारांचा अभ्यास म्हणजेच 'सार्वजनिक आयव्यय' अथवा 'सार्वजनिक वित्त' होय.
4. सार्वजनिक वित्त याला सार्वजनिक आय-व्यय, राजस्व किंवा सार्वजनिक वित्त व्यवस्था असे सुद्धा म्हणतात.
5. सार्वजनिक वित्त म्हणजे सरकारच्या उत्पन्न व खर्च याचा अभ्यास होय.

सार्वजनिक आयव्ययाच्या (राजस्वाच्या) अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे,

१) डॉ. डाल्टनच्या मते, "सार्वजनिक आयव्यय हा विषय अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यांच्या सीमारेषेवर असलेल्या अनेक विषयांपैकी एक आहे. तो सार्वजनिक सत्तांचे उत्पन्न व खर्च ह्या दोहोंचे परस्परांशी समायोजन यांच्याशी संबंधीत आहे."

("Public Finance deals with the income and expenditure of public authorities and with the manner in which one is adjusted with the other." Dr. Dalton)

२) प्रो. फिंडले शिरासच्या मते, "राजस्व हे सार्वजनिक सत्तांच्या उत्पन्न मिळविण्याच्या व खर्च करण्याच्या पद्धतींशी निगडीत असलेले शास्त्र होय."

("Public Finance is the science which is concerned with the manner in which the public authorities obtain their income and spend it." Findlay Shirras)

## सार्वजनिक वित्ताची वैशिष्ट्ये

1. सार्वजनिक सत्तांच्या अर्थव्यवहारांची समीक्षा करणारे शास्त्र आहे.
2. सार्वजनिक सत्ता या संकल्पनेत ग्रामपंचायत,नगरपालिका ,महानगरपालिका,जिल्हा परिषद ,राज्य सरकार यांचा समावेश होतो.
3. हा विषय अर्थशास्त्र व राज्यशास्त्र यामधील महत्वाचा दुवा आहे.
4. सामाजिक न्याय व महत्तम सामाजिक लाभ याचा विचार केला जातो.
5. सरकारच्या उत्पन्न व खर्च करण्याच्या क्रियांचा समावेश होतो.

## सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती

**(Scope of Public Finance)**

सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती ही सरकारच्या कार्याच्या व्याप्तीवरुन निश्चित होते. सार्वजनिक सत्तांचा व्याप जेवढा जास्त तेवढी सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती जास्त. सार्वजनिक आयव्ययाचा अभ्यास विषय प्रामुख्याने पुढील पाच विभागांमध्ये विभागला जातो. हे पाचही विभाग वेगवेगळे असले तरी परस्परांशी संबंधीत आहेत. या विभागाविषयी थोडक्यात माहिती पाहू.

| | |
|---|---|
| १) सार्वजनिक उत्पन्न | (Public Revenue) |
| २) सार्वजनिक खर्च | (Public Expenditure) |
| ३) सार्वजनिक कर्ज | (Public Debts) |
| ४) वित्तीय प्रशासन | (Financial Administration) |
| ५) संघीय वित्तव्यवस्था | (Federal Finance) |

# सार्वजनिक वित्ताचे स्वरूप

खाजगी आयव्यय व सार्वजनिक आयव्यय याची तुलना केल्यास सार्वजनिक आयव्ययचे स्वरूप स्पष्ट होईल.

### साम्य/समानता

1. उत्पन्न व खर्च यांचा मेळ घालणे.
2. महत्तम समाधान प्राप्ती.
3. कर्ज घेणे.
4. साधनाची दुर्मिळता.

### फरक

1. उत्पन्न व खर्च याचे समायोजन.
2. उत्पन्न साधनात भिन्नता.
3. अंदाजपत्रकाचे स्वरूप.
4. आयव्ययची गुप्तता.
5. समसीमान्त उपयोगिता नियम.
6. वित्तमधील लवचिकता.

# राजकोषीय धोरण – उद्देश आणि साधने

## Fiscal Policy – Objective and Tools

1. आपले आर्थिक उद्येश तडीस नेण्यासाठी आवश्यक ती शासकीय उत्पन्नाची आणि खर्चाची पातळी गाठता यावी म्हणून उपलब्ध सांधनांचा योग्य वापर करण्याचे सरकारी धोरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.
2. कर आकारणे, खर्च करणे, कर्ज उभारणे, कर्ज देणे आणि खरेदी व विक्री व्यवहार करणे. ह्या साधनांचा सयुक्तिक व विवेकपूर्ण वापर करणे यालाच 'राजकोषीय धोरण' म्हणतात.
3. राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन व रोजगार यावर सार्वजनिक उत्पन्न (कर), खर्च व कर्ज यांचे हानिकारक परिणाम टाळून लाभकारक परिणाम मिळवून देणारे शासकीय धोरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.
4. सार्वजनिक उत्पन्न आणि खर्च हे राजकोषीय धोरणाचा आत्मा समजला जातो.
5. सरकारचे उत्पन्न व खर्च याविषयीचे धोरण म्हणजे राजकोषीय धोरण, राजकोषीय नीती किंवा वित्तीय धोरण होय.

शासकीय जमाखर्चाशी संबंधित धोरणाला राजकोषीय धोरण असे म्हणतात. शासनाच्या वित्तीय व्यवहारांचा अभ्यास म्हणजे सार्वजनिक वित्त होय. सरकारला मिळणारे उत्पन्न आणि सरकारचा होणारा खर्च हा सार्वजनिक वित्ताचा महत्त्वाचा भाग आहे. शासन राजकोषीय धोरण जमाखर्चाचे वार्षिक विवरणपत्र मांडून जाहीर करते. याला शासनाचा **अर्थसंकल्प** असेदेखील म्हणतात

## राजकोषीय धोरण उद्देश

1) आर्थिक विकास साध्य करणे
2) पूर्ण रोजगार निर्माण करणे
3) आर्थिक विषमता कमी करणे
4) आंतरराष्ट्रीय व्यापारतोल विषमता दूर करणे
5) चलनवाढ नियंत्रण ठेवणे
6) दारिद्र्य निर्मुलन
7) भांडवल निर्मितीस चालना देणे

## राजकोषीय धोरण साधने

1) कर
2) सार्वजनिक खर्च
3) तुटीचा अर्थभरणा
4) कर्ज
5) अंदाज पत्रक / अर्थसंकल्प

# अर्थसंकल्प – अर्थ, प्रकार व महत्व

१. अर्थसंकल्प म्हणजे सरकारच्या वित्तीय साधनाचे व्यवस्थापन होय.

२. बजेट हा शब्द 'Baugette' या फ्रेंच शब्दापासून तयार झाला आहे. बजेट हा शब्द इंग्लंडमध्ये सर्वप्रथम १७३३ मध्ये वापरण्यात आला.

३. भारतीय राज्यघटनेत Budget हा शब्द प्रयोग नसून त्याऐवजी कलम ११२ मध्ये वर्षीक वित्तीय विवरणपत्र (Annual Financial Statement) असा उल्लेख आहे.

४. भारताचा पहिला अर्थसंकल्प ७ एप्रिल १८६० रोजी जेम्स विल्सन याने मांडला.

५. स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झालेल्या अंतरिम सरकारमधील लियाकत अली खान यांनी १९४७-४८चा अर्थसंकल्प मांडला.

६. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले वित्तमंत्री आर. के. शण्मुखम शेट्टी यांनी स्वातंत्र्यानंतरचा पहिला अर्थसंकल्प २६ नोव्हेंबर १९४७ रोजी मांडला.

७. घटनेच्या ११२ व्या कलमानुसार केंद्र सरकारचा तर २०२ व्या कलमानुसार राज्य सरकारचा अर्थसंकल्प मांडला जातो.

8. कोणत्याही वर्षाच्या अर्थसंकल्पात सरकारी जमाखर्चाचे तीन वर्षांचे आकडे दिलेले असतात. १) गेल्या वित्तीय वर्षाचे प्रत्यक्ष आकडे (Actuals) २) चालू वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज (Budgetary Estimates) व संशोधित अंदाज (Revised Estimates) ३) पुढील वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज (Budgetary Estimates)

9. अर्थसंकल्प हा वित्त मंत्रालयांतर्गत कार्य करणाऱ्या आíथक कामकाज विभागामार्फत (Department of Economic Affairs) तयार केला जातो अर्थसंकल्पाच्या एक दिवस आधी चालू वर्षाची भारताची आर्थिक पाहणी (Economic survey) अहवाल संसदेत मांडला जातो.

10. १९२१ च्या ॲकवर्थ समितीच्या शिफारशीनुसार १९२४ पासून रेल्वेचा अर्थसंकल्प वेगळा मांडला जातो. स्वतंत्र भारताचे पहिले रेल्वे अंदाजपत्रक जॉन मथाई यांनी नोव्हेंबर 1947 मध्ये सादर केले.

11. आर.के. षण्मुखम शेट्टी यांनी अविभाजित भारत व स्वतंत्र भारत या दोघांसाठी अर्थसंकल्प सादर केला . जॉन मथाई यांनी भारतीय गणराज्यासाठीचा पहिला अर्थसंकल्प १९५० साली सादर केला, मोरारजी देसाई यांनी सर्वात जास्त वेळा १० वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे

13. देशाच्या 92 वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच, 2016 मध्ये रेल्वे अंदाजपत्रक अर्थसंकल्पात समाविष्ट करून, एकत्रित अर्थसंकल्प सादर केला गेला. शेवटचे रेल्वे अंदाजपत्रक सुरेश प्रभू यांनी सादर केले,
14. रेल्वे अंदाजपत्रकाचे पहिले दूरचित्रवाणी प्रक्षेपण 24 मार्च 1994 रोजी केले गेले.
15. अर्थसंकल्प १ एप्रिल ते ३१ मार्च या पुढील वित्तीय वर्षासाठी मंडला जातो. बजेट म्हणजे देशाचा वर्षभरासाठीचा जमाखर्च. म्हणजे थोडक्यात सांगायचं तर पुढच्या आर्थिक वर्षात आपल्याकडे किती पैसे गोळा होण्याचा अंदाज आहे आणि यातले किती पैसे, कुठे खर्च करायचा बेत आहे, हे सांगणारं डॉक्युमेंट.
16. ब्रिटीशांच्या काळापासून दरवर्षी 28 फेब्रुवारीला देशाचं बजेट सादर केलं जात होतं. पण आता बजेट 1 फेब्रुवारीला सादर केलं जात आहे.
17. आतापर्यंतचे अर्थमंत्री ब्रिटीश परंपरा पुढे चालवत लाल ब्रीफकेसमधून बजेट घेऊन यायचे. निर्मला सीतारामन अर्थमंत्री झाल्यापासून त्यांनी भारतीय परंपरेतलं बही-खाता हा चोपडीसारखा प्रकार आणायला सुरुवात केली.

# अर्थसंकल्पांचे स्वरूप (Structure of Budget)

१) पारंपरिक अर्थसंकल्प (Traditional Budget)- यात कोणत्या क्षेत्रावर वा बाबींवर किती खर्च होईल याचा उल्लेख असतो, मात्र त्या खर्चाने काय परिणाम होईल याचा उल्लेख नसतो.

२) निष्पादन अर्थसंकल्प (Performance Budget)- वित्तीय संसाधनांची विभागणी अधिक कार्यक्षम व परिणामकारकरीत्या होण्यासाठी प्रदानांवर आधारित (Output – oriented) अर्थसंकल्प निर्मिती करणे. पहिला प्रयोग यूएसएमध्ये झाला.

३) शून्याधारित अर्थसंकल्प (Zero Based Budget)- दरवर्षी नव्याने विचार करून जमा व खर्च अंदाज करणे. पीटर पिहर यांना या अर्थसंकल्पाचे प्रवर्तक मानले जाते. भारतात महाराष्ट्र राज्याने १ एप्रिल १९८६ रोजी शून्याधारित अर्थसंकल्प साजरा केला. त्या वेळी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण होते. वित्तमंत्री सुशीलकुमार शिंदे व वित्त राज्यमंत्री श्रीकांत जिचकर होते. २००१ मध्ये आंध्र प्रदेशात शून्याधारित अर्थसंकल्प मांडण्यात आला. (हा शेवटचा प्रयोग होता.)

४) फलनिष्पत्ती अर्थसंकल्प (Outcome Budget)- भारताच्या इतिहासात सर्वप्रथम पी. चिदंबरम यांनी २५ ऑगस्ट २००५ रोजी सन २००५-२००६ या वर्षासाठी सादर केला. गुंतवणूक खर्चापासून होणारे परिणाम, जेव्हा त्या परिणामांना आधार बनवून बजेट तयार केले जाते तेव्हा त्याला निष्पादन बजेट म्हणतात

# अर्थसंकल्पाचे प्रकार (Types Budget)

## अ) उत्पन्न व खर्चाच्या स्वरूपानुसार

१) समतोल अर्थसंकल्प (Balanced Budget)- सरकारचे अंदाजित उत्पन्न व अंदाजित खर्च सारखे असतात

२) शिलकीचा अर्थसंकल्प (Surplus Budget)- सरकारचे अंदाजित उत्पन्न अंदाजित खर्चापेक्षा जास्त असते

३) तुटीचा अर्थसंकल्प (Deficit Budget)- सरकारच्या अंदाजित उत्पन्नापेक्षा अंदाजित खर्च जास्त असतो

## ब) महसुली अंदाजपत्रक व भांडवली अंदाजपत्रक (Revenue Budget and Capital Budget)

## क) शून्याधारीत अंदाजपत्रक (Zero Based Budget)

## ड) लिंगाधारीत अंदाजपत्रक (जेंडर बजेड Gender Budget)

# सार्वजनिक उत्पन्नाची साधने / मार्ग

## केंद्र सरकारच्या उत्पन्नाची साधने

### अ) महसुली उत्पन्न

१) कर उत्पन्न – १) उत्पन्न व खर्चावरील कर उदा. उत्पन्न कर (आय कर), निगम कर, खर्चावरील कर २) मालमत्ता व भांडवली व्यवहारवारील कर उदा. मालमत्ता कर, संपत्ती कर, जमीन महसूल, नोंदणी व स्टॅम्प कर ३) वस्तु व सेवा कर

२) करेतर उत्पन्न – व्याजपासून प्राप्त उत्पन्न, बँक, पोस्ट या वित्तीय सेवा व सामाजिक सेवा यापासून प्राप्त उत्पन्न, सार्वजनिक उद्योगातील लाभांश व नफा, परकीय मदत,अनुदान इत्यादि पासून प्राप्त उत्पन्न

### ब) भांडवली उत्पन्न

१) कर्ज वसूली, २) कर्ज रोखे विक्री, ३) परकीय कर्ज, ४) इतर भांडवली उत्पन्न ५) सूक्ष्म बचती

## राज्य सरकारच्या उत्पन्नाची साधने

अ) कर – १) शेती उत्पन्नावरील कर २) जमीन महसूल
३) जाहिरांतीवरीलल कर ४) विक्री कर
५) करमणूक कर ६) अल्कोहोल व इतर पेयांवरील अबकारी कर ७) वीज कर
८) इतर कर – वणविकास कर, राज्य आधिभार आणि उपकर, स्टॅम्प व नोंदणी फी,

ब) केंद्र सरकारच्या करातील राज्यांचा हिस्सा

क) सार्वजनिक कर्जे

ड) सहाय्यक अनुदाने

इ) सार्वजनिक प्रल्पामुळे प्राप्त उत्पन्न

### स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर उत्पन्न :–

स्थानिक पातळीवर आर्थिक व्यवस्थापन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. पण या संस्थांना आपली कार्ये योग्य रितीने पार पाडण्यासाठी उत्पन्नाची गरज भासते. राज्यघटनेने स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी व विकासाची कामे करण्यासाठी काही कर नेमून दिले आहेत, ते पुढीलप्रमाणे :–

१) जमीन महसूल.
२) सामान्य मालमत्ता कर.
३) चित्रपटगृहांवरील कर.
४) पाणीपट्टी.
५) व्यवसाय कर.
६) करमणूक कर.
७) घरपट्टी.
८) वाहनांवरील कर.
९) प्रवासी वाहतूक कर.
१०) नफा कर.

वरील करांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांना कर महसूल प्राप्त होतो. या कर उत्पन्नामधून स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन चालते.

# कर धोरण – संकल्पना

**कर आकारणीचा किंवा कराचा अर्थ/व्याख्या व उद्दिष्टये:**

कर हे सरकारच्या उत्पन्नाचे एक महत्वाचे साधन आहे. कर म्हणजे काय याबाबत निरनिराळ्या व्याख्या करण्यात आल्या आहेत. कर हा सक्तीने वसूल केला जातो आणि त्याचा उपयोग सार्वजनिक खर्च भागविण्यासाठी केला जातो.

१) 'कर म्हणजे सक्तीचे देणे होय'.

२) प्रा. सेलीगमन- 'कर हा लोकांकडून सक्तीने घेतला जातो व तो सर्वांच्या हितासाठी खर्च केला जातो आणि व्यक्तीगत लाभाशी त्याचा काहीही संबंध नसतो'.

३) बॅस्टबल - 'कर म्हणजे व्यक्ती किंवा संस्थेने स्वत:च्या संपत्तीचा सार्वजनिक सत्तेच्या सेवेसाठी दिलेला सक्तीचा हिस्सा होय'.

४) डॉ. डॉल्टन- 'कर हे सक्तीचे देणे आहे व त्याचा सममूल्य सेवेशी काहीही संबंध नाही. त्याचप्रमाणे कर हा किंमत, शुल्क, दंड यापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे'.

**कराची वैशिष्ट्ये/ लक्षणे :** या व्याख्यावरुन करांची पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१) कर हे सक्तीचे देणे असते.

२) करांचे उत्पन्न सार्वजनिक खर्चासाठी वापरले जाते.

३) कर सरकारकडूनच लावले जातात. याचा अर्थ- कर आकारण्याचा अधिकार फक्त सरकारलाच असतो.

४) कर देणारा कर देतांना सरकारशी कोणताही करार करीत नाही.

५) कर व करपद्धतीला विशिष्ट तत्वांचा आधार असतो.

६) कर म्हणजे फक्त उत्पन्नाचे साधन नाही. योग्य परिणाम करणारे साधन आहे.

७) कर व्यक्ती किंवा संस्थेला भरावा लागतो.

८) कर वसुलीला कायद्याचा आधार असतो.

९) काही वेळा करभाराचे संक्रमण होणे शक्य असते.

**कर आकारणीचे उद्दिष्टे** (Objectives of Taxation)

१) **उत्पन्न मिळविणे** : उत्पन्न मिळविणे हे कर आकारणीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. असे डॉ. डॉल्टन यांनी व्यक्त केले आहे. कारण सरकारलादेशाच्या विकासासाठी विविध योजना राबवाव्या लागतात. त्या योजनांवर होणारा प्रचंड खर्च भागविण्यासाठी आवश्यक तेवढा पैसा करातून मिळविणे आवश्यक असते.

२) **आर्थिक विषमता कमी करणे** : समाजातील उत्पन्न व संपत्तीच्या वाटणीतील विषमता कमी करणे हे कर आकारणीचे दुसरे महत्वाचे उद्दिष्ट असते. सरकार प्रत्यक्षकरांच्या साह्याने श्रीमंत वर्गाकडील जादा पैसा काढून घेते व त्यातून सर्वसामान्य व गरीब लोकांच्या कल्याणासाठी खर्च करते. त्यामुहे श्रीमंताची श्रीमंती कमी होण्यास व गरिबांची गरीबी कमी होण्यास मदत होते.

३) **अनावश्यक उपभोग कमी करणे** : सरकार करांच्या साहाय्याने समाज हिताला आणि सामाजिक स्वास्थ्याला बाधा आणणाऱ्या वस्तू व सेवांवर कर वाढवून त्या वस्तूंचे उत्पादन व उपभोग कमी करण्यास भाग पाडते. उदा. अफू, दारु, विडी, सिगारेट, इतर अंमली पदार्थ. काही वेळा श्रीमंतांच्या चैनीच्या वस्तूंवर कर वाढवून पैसा काढून घेते. त्यामुळे त्यांचा उपभोग घटतो.

४) **राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे** : भारतासारख्या अल्पविकसित व विकसनशिल देशात राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न कमी असते. म्हणून सरकार बचत व गुंतवणूक वाढविण्यासाठी कर सवलती जाहिर करते. त्यामुळे देशात बचत-गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळते. एकुण रोजगार वाढतो व देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

५) **भाववाढ रोखणे** : सरकार प्रत्यक्ष करांचे दर वाढवून लोकांकडील अधिक पैसा काढून घेते. त्यामुळे लोकांची वस्तू व सेवा मागणी कमी होते. परिणामी देशातील भाववाढ रोखण्यास मदत होते.

६) **आयात-निर्यात वाढीला प्रोत्साहन देणे** : सरकार अनावश्यक वस्तूंची आयात कमी करण्यासाठी आयात वस्तूंवरील जकाती वाढविते, आवश्यक वस्तूची आयात वाढावी म्हणून आयात करात सवलती देते. तसेच समाजहितासाठी देशातील वस्तूंची निर्यात कमी करण्यासाठी निर्यात वस्तूंवर निर्यात जकातीमध्ये वाढ करते. तसेच निर्यात वाढीसाठी काही वस्तूंना निर्यात करात सवलती देते. अशाप्रकारे करांद्वारे विदेशी व्यापारावर नियंत्रण ठेवते.

SPPU Study Notes

# कर धोरण – संकल्पना

**कर संकल्पना** (Concept of Tax)

**कराघात, करसंक्रमण आणि करभार संकल्पना** (Concept of Impact, Shifting of Tax, Incidence of a Tax)

जेव्हा सरकार एखाद्या कर आकारते तेव्हा एक विशिष्ट प्रक्रिया निर्माण होते. त्या प्रक्रियेत कराघात, करसंक्रमण आणि करभार यांचा समावेश होतो त्यामध्ये कराघात ही पहिली क्रिया होय. करसंक्रमण ही दुसरी आणि करभार ही शेवटची क्रिया होय.

१) **कराघात** : सरकारने आकारलेला कर भरण्याची जबाबदारी ज्या व्यक्तीवर असते त्या व्यक्तीवर कराघात होतो. किंवा ज्या व्यक्तीकडून कर प्रथम वसूल केला जातो त्या व्यक्तीवर कराचा आघात होत असतो. त्याला कराघात म्हणतात. कराचा आघात म्हणजेच करामुळे निर्माण झालेला तात्पूरता परिणाम होय. जी व्यक्तीवर

कायद्याने कर भरण्याची जबाबदारी असते. ती व्यक्ती कर स्वत:न भरता बऱ्याच वेळा इतरांकडून वसूल करते. तर काही वेळा स्वत:लाच भरावा लागतो. जसे सरकारने वस्तू व सेवांवर लावलेला कर सरकार प्रथम उत्पादकांकडून वसूल करते म्हणून कराचा आघात उत्पादकावर होतो. नंतर उत्पादक ती कराची रक्कम वस्तू व सेवांच्या किंमतीत समाविष्ट करतो. शेवटी कराचा भार ग्राहकांना सहन करावा लागतो.

प्राप्तीकर भरण्याची जबाबदारी प्राप्तीकरदात्याची असते. कारण व्यक्तीच्या उत्पन्नावरील कर दुसऱ्यावर ढकलता येत नाही. म्हणून त्याच व्यक्तींवर कराचा आघात होतो व करभारही त्याच व्यक्तीवर पडतो.

२) **कर संक्रमण** : 'प्रथम ज्या व्यक्तीवर कर लावला जातो, ती व्यक्ती त्या कराचा भार पूर्णत: किंवा अंशत: दुसऱ्यावर ढकलते. असा कर दुसऱ्यावर ढकलण्याच्या क्रियेला करसंक्रमण असे म्हणतात'.

**व्याख्या** : 'एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे करभार ढकलण्याच्या क्रियेला करसंक्रमण असे म्हणतात'.

करसंक्रमण दोन प्रकारचे असते.

अ) पुढच्या दिशेने होणारे करसंक्रमण (Forward shifting of Tax)

ब) मागच्या दिशेने होणारे करसंक्रमण (Backward Shifting of Tax)

अ) पुढच्या दिशेने होणारे करसंक्रमण : 'जेव्हा कराचे संक्रमण उत्पादकाकडून विक्रेत्याकडे आणि विक्रेत्याकडून ग्राहकांकडे होत असते, तेव्हा त्या करसंक्रमणाला पुढच्या दिशेने होणारे कर संक्रमण असे म्हणतात'.

कर ----उत्पादक ---- घाऊक व्यापारी ---- किरकोळ व्यापारी ----- ग्राहक

ब) मागच्या दिशेने होणारे करसंक्रमण : जेव्हा कराचे संक्रमण ग्राहकाकडून विक्रेत्यांकडे आणि विक्रेत्यांकडून उत्पादकाकडे होते तेव्हा त्यास मागच्या दिशेने होणारे संक्रमण म्हणतात.

उदा. कर ----- साखर उत्पादक ---- ऊस उत्पादक शेतकरी

थोडक्यात जेव्हा कराचे संक्रमण पुढच्या दिशेने होते. तेव्हा कराचा भार उपभोक्त्यांवर पडतो. आणि तेव्हा करांचे संक्रमण मागच्या दिशेने होते. तेव्हा करभार उत्पादकांवर पडतो. करसंक्रमण पूर्णत: किंवा अंशत: होऊ

३) **करभार** : 'सरकारने आकारलेल्या कराचे द्रव्यरुप ओझे किंवा पैशातील भार कोणावर पडतो हे सांगणे म्हणजेच करभार होय'.

करभार म्हणजे ज्या व्यक्तीला पैशातील भार सहन करावा लागतो. शेवटी कराचा म्हणजे कर ज्या ठिकाणी स्थिरावतो ती जागा होय'. अशी करभाराची व्याख्या केली जाते.

कर प्रथम कोणावर लावला जातो, तो सरकारच्या खजिन्यात कोण भरतो आणि शेवटी भार कोण सहन करतो व या भाराचे अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतात यांचे विवेचन म्हणजे करभार होय.

कराघात, करसंक्रमण व करभार या कर आकारणीच्या प्रक्रियेतील शेवटची क्रिया म्हणजे करभार होय.

# कर धोरण – संकल्पना

## भारतीय कर रचना (Indian Tax Structure)

**करांचे वर्गीकरण प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर या दोन प्रकारात केले जाते.**

**प्रत्यक्ष करः** यात निश्चित व्यक्तीवरच करांचा आघात होतो आणि त्याचा अंतीम भारही त्याच व्यक्तीला सहन करावा लागतो. म्हणजे कराघात आणि करभार एकाच व्यक्तीवर होतो. अशा कराच्या वसुलीचा खर्चही कमी असतो, निश्चितता आणि लवचिकता असते. यातुन करदात्यामध्ये सजगता निर्माण होऊन सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत होते. मात्र या करामुळे उपभोग प्रवृत्ती घटण्याचा धोका निर्माण होणे, काळा पैसा वाढणे, प्रत्यक्ष उत्पन्न न दाखविणे, बचत व गुंतवणुकीवर अनिष्ट परिणाम होणे असे दोष निर्माण झाले होते. एकरकमी कर भरण्यातील कागदपत्रांच्या क्लिष्ट प्रक्रियेमुळेही करदाते कर भरण्याचे टाळत होते. यात, उत्पन्न किंवा प्राप्ती कर, कंपनी कर किंवा मालमत्ता कर, देणगी कर, महामंडळ कर, खर्चावरील कर यांचा समावेश होता.

**अप्रत्यक्ष करः** हा कर उत्पन्नावर न आकारता वस्तूवर, उत्पादकावर, निर्यातदरावर, आयातीवर तसेच करमणूकीच्या साधनांवर आकारला जाई. या करामुळे कराघात एकावर व करभार दुसऱ्यावर अशी स्थिती होती. करदात्याला हा कर चुकविता येत नाही किंवा एकरकमी भरावाही लागत नाही. करदात्याला अधिक सोयीचा आणि सरकाराला अधिक उत्पन्न देणारा हा कर विकसनशील देशाच्या आर्थिक विकासासाठी अनुकूल आहे. मात्र करदात्याच्या दृष्टिने अन्यायकारक असणाऱ्या या करामुळे उपभोगावर परिणाम होतो. उत्पादन व रोजगारावर मर्यादा येतात, उत्पन्नाची अनिश्चितता असते. यात केंद्रीय उत्पादन शुल्क, आयात निर्यात कर, सेवा कर, प्रगतिशील आणि पुरोगामी करांचा समावेश असायचा.

# वस्तू आणि सेवाकर (Goods and Service Tax - GST)

१) संपूर्ण देशामध्ये एकसमान (वस्तू व सेवा कर - एक राष्ट्र, एक कर, एक बाजार) अप्रत्यक्ष करपद्धतीकरिता वस्तु व सेवा कर प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र व राज्यशासनांनी एकमताने घेतला.

२) वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणी करिता संविधानात बदल करण्याची आवश्यकता होती .त्यानुसार बदल करण्याचे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले ,व लोकसभेने संविधान ( १२२ वी घटना दुरुस्ती ) विधेयक २०१४ दिनांक ६ मे २०१५ रोजी संमत केले ,

३) राज्यसभेने काही बदलासहित वस्तू व सेवा कर विधयेक २०१४ दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी पारित केले.

४) राज्यसभेने सुचवलेले बदल लोकसभेने दि . ८ ऑगस्ट २०१६ रोजी स्वीकृत केले

५) वस्तू व सेवा कर जीएसटी(GST) भारतात ०१ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला.

६) गुड्स ॲन्ड सर्व्हिसेस काउन्सिल' ही मध्यवर्ती वैधानिक संस्था जीएसटीचे नियमन करते. केंद्रीय अर्थमंत्री हे या काउन्सिलचे प्रमुख आहेत.

७) CGST (सेंट्रल-जीएसटी)- यामध्ये केंद्राच्या कर संकलनाचा समावेश होतो.

८) SGST (स्टेट जीएसटी)- यामध्ये कर आकारण्याची जबाबदारी राज्याची असते. यामध्ये केंद्र हस्तक्षेप करत नाही.

९) IGST (इंटिग्रेटेड जीएसटी)- यामध्ये कर संकलन भारतीय संघराज्याच्या अखत्यारीत येते. ते केंद्रीय सरकार गोळा करते, परंतु नंतर ते राज्यांमध्ये हस्तांतरित केले जाते.

१०) जीएसटी अंतर्गत १ जुलै २०१७ पासून ०%, ५%,१२%,१८%, व २८% असे कर दर ठरविण्यात आले आहेत.

# सार्वजनिक कर्जाची स्त्रोत / मार्ग

## अ) अंतर्गत मार्ग

१) व्यक्ति

२) व्यापारी बँका

३) बाजार कर्ज

४) राजकोषीय हुंड्या

५) भविष निर्वाह निधी

६) अल्प बचतीच्या आधारावर सुरक्षित कर्ज

## ब) बहिर्गत मार्ग

१) परकीय नागरिक

२) विदेशी सरकार

३) आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था

# सार्वजनिक खर्चाचे घटक

## केंद्र सरकारचा विकासात्मक बाबीवरील खर्च

१) सामाजिक व सामुदायिक सेवा
२) सामान्य आर्थिक सेवा
३) कृषि आणि संबंधित सेवा
४) उद्योग आणि खनिजे
५) खतांवरील सबसिडी
६) सिंचन ऊर्जा आणि पूर नियंत्रण
७) वाहतूक आणि दळणवळण
८) सार्वजनिक कार्य
९) राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना अनुदान

## केंद्र सरकारचा बिगर विकासात्मक बाबीवरील खर्च

१) व्याज देयक
२) संरक्षण सेवा वरील खर्च
३) राज्यांतर्गत खर्च – न्याय, निवडणुका, ऑडिट
४) आर्थिक सेवा
५) प्रशासकीय सेवा
६) पेन्शन आणि सेवानिवृत्ती वरील खर्च
७) विविध प्रकारचे अनुदान
८) सामाजिक सुरक्षा आणि कल्याण
९) इतर खर्च – कर्ज, Advances, फंड हस्तांतरण

# सार्वजनिक खर्च वाढीचे कारणे

कोटी रुपये इतक्या मोठ्या प्रमाणा...

## २.४ : सार्वजनिक खर्चाच्या वाढीची कारणे

**Causes of Increase in Public Expenditure. :-**

विकासाच्या अवस्थामध्ये सार्वजनिक सत्तेला खर्च हा घटक महत्त्वाचा असतो. पूर्वीच्या काळी शासनाची कामे मर्यादीत स्वरूपाची होती; परंतु अलिकडील काळात म्हणजेच १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीस समाजवादी विचारसरणी उदयास आली. यामध्येच कल्याणकारी राज्याची संकल्पना मूळ धरू लागली. अनेक देशांनी लोकशाही स्वीकारली या अर्थव्यवस्थामध्ये सरकारची व सरकारच्या खर्चाची भूमिका महत्त्वाची ठरू लागली. २० व्या शतकाच्या शेवटी आणि २१ व्या शतकाकडे झेपावत असताना अनेक खर्चाच्या नवीन संकल्पना पुढे आल्या. आणि सार्वजनिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. आधुनिकतेकडे जात असताना नवीन तंत्रज्ञान स्वीकारले गेले. अर्थव्यवस्थापुढे कृषी, पर्यावरण, संरक्षण, अंतर्गत अशांतता, अवकाश तंत्रज्ञान, अंतराळमोहीमा, नैसर्गिक संकटांना सामोरे जाणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देश, संस्थांना आर्थिक मदत यामुळे सार्वजनिक खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ती कारणे पुढील प्रमाणे.

१. सरकारी कार्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात.
२. लोकसंख्यावाढ व लोकांच्या वाढत्या गरजा.
३. संरक्षण खर्चातील वाढ.
४. देशातंर्गत शांतता व सुव्यवस्था.
५. खासगी क्षेत्रातील उद्योगांना संरक्षण व मदत.
६. कृषीविकास व कृषीपीक विमा वाढता खर्च.
७. नागरीकरणामुळे (शहरीकरण) मुळे वाढता खर्च.
८. सामाजिक कल्याण योजना वाढ.
९. आर्थिक तेजीमंदी विरुद्ध उपाययोजना.
१०. कल्याणकारी राज्याची संकल्पना.
११. वाढत्या महागाईमुळे शासकीय कर्मचारी वेतन व भत्ते.
१२. सामाजिक सुरक्षितता खर्चवाढ.
१३. राष्ट्रीयकरणाचे धोरण.
१४. कर्ज व कर्जावरील व्याज परतफेड.
१५. सरकारी यंत्रणेमार्फत अनावश्यक खर्च उधळपट्टी.
१६. अंतराळ मोहीम.
१७. पर्यावरण संतुलन व विकास कार्यक्रम.
१८. ग्रामीण विकासाच्या विविध योजना.
१९. आपत्तीनिवारण

# तुटीचा अर्थभरणा – Deficit Financing i

## ❑ तुटीचा अर्थभरणा म्हणजे काय?

सर्वसाधारणपणे शासनाचा चालू महसूलापेक्षा चालू खर्च हा अधिक होतो त्या वेळेला जो ज्यादाचा झालेला खर्च भरून काढण्यासाठी सार्वजनिक कर्जाचा वापर केला जातो, त्यावेळी आपण तुटीचा अर्थभरणा झाला असे म्हणतो. सार्वजनिक कर्जाचा वापर केवळ तुटीचा अर्थभरणासाठीच केला जातो, असे नाही तर अन्य काही करणासाठी पण वापर केला जातो.

सरकाराला वेगवेगळ्या मार्गांनी उत्पन्न मिळत असते. उदाहरणार्थ कर, शुल्क, व अनुदान इत्यादी अनेक मार्गांनी उत्पन्न मिळत असते. या सर्वच मार्गांनी मिळणाऱ्या उत्पनापेक्षा शासनाचा खर्च अधिकच असतो. हा जो जादाचा खर्च भरून काढण्यासाठी शासन तुटीचा अर्थभरणा मार्ग अवलबंते. शासन नेहमीच्या मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जादाचा हा खर्च भरून काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेजवळ किंवा ट्रेझरीजवळ ठेवलेली रोख रक्कमसुद्धा वापरू शकते अथवा नवीन नोटांची छापाई अथवा शासन रिझर्व्ह बँकेकडून कर्ज सुद्धा घेऊ शकते. यापैकी कोणतीही योजना अंमलात आणून शासन अर्थव्यवस्थत पेशाच्या पुरवठ्यात वाढ घडून आणण्याचा प्रयत्न करते.

सोप्या भाषेत आपण उदाहरणासहित तुटीचा अर्थभरणा म्हणजे नेमकं काय ते समजून घेऊया. भारत सरकारचे एकूण उत्पन्न १,००,००० रुपये आहे. आणि सरकारचा एकूण खर्च २,००,००० रुपये आहे. तर शासनाला वरील जादाचा खर्च १,००,००० रुपये हे कर्जाच्या स्वरूपात इतर अंतर्गत किंवा संस्थांच्या कडून घ्यावे लागतात या १,००,००० उभा करण्यासाठी जो पर्याय वापरला जातो आणि वरील १,००,००० रुपयांचा खर्च भरून काढला जातो. या भरून काढलेल्या खर्चास आपण तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात.

## अ) तुटीच्या विविध संकल्पना

अ) महसुली तूट = महसूली उत्पन्न - महसुली खर्च.

ब) अर्थसंकल्पीय तूट = एकूण उत्पन्न - एकूण खर्च.

क) राजकोषीय/वित्तीय तूट = एकूण खर्च - महसूली उत्पन्न + कर्ज बसुली ब + इतर भांडवली मिळकत.

ड) प्राथमिक तूट = राजकोषीय तूट-घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा खर्च.

अशाप्रकारे महसूल तूट अंदाजपत्रकीय तूट, राजकोषीय/वित्तीय तूट, प्राथमिक तूट हे राजकोषीय संकटाचे प्रमुख निर्देशक आहेत.

## तुटीचा अर्थभरणा करण्याच्या पद्धती / मार्ग

१) मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेणे
२) सरकारचे मध्यवर्ती बँकेतील रोख रक्कम काढून घेणे
३) व्यापारी बँकांना सरकारी कर्ज रोखे विकून कर्ज घेणे
४) चलन पुरवठ्यात वाढ / नवीन चलन निर्मिती करणे
५) विदेशी कर्ज घेणे

## तुटीचा अर्थभरणा वाढण्याची कारणे

१) देशतील नैसर्गिक साधनांचा पुरेपूर वापर करणे
२) गुंतवणूक पातळीत वाढ करणे
३) प्रभावी मागणीत वाढ करणे
४) मंदीच्या स्थितीवर मात करणे
५) लोकसंख्या नियंत्रणासाठी उपाययोजना
६) कर आकारणी व महसूल प्रपतीतील मर्यादा दूर करणे
७) दारिद्र्य व बेकारी दूर कारणे
८) युद्धजन्य परिस्थितीस तोंड देणे

संघराज्य पद्धतीत घटकसत्तांमध्ये वित्तीय तोल राखण्यासाठी काही व्यवस्था करावी लागते. भारताने संघराज्य पद्धतीची शासनप्रणाली स्वीकारली असून एकाच वेळी केंद्रस्थानी मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांसाठी राज्य सरकारे स्थापन केली जातात. या संघराज्य पद्धतीत घटना कलम २४६ अन्वये केंद्र व राज्य सरकारे यांच्यामध्ये कार्याची शास्त्रशुद्ध विभागणी त्रिसूत्री पद्धतीने करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारकडे संरक्षण, टपाल व तारखाते, चलननिर्मिती, परराष्ट्रव्यापार, राष्ट्रीय महामार्ग, नौकानयन व हवाई वाहतूक इत्यादी जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत; तर घटक राज्य सरकारांकडे कृषी, आरोग्य व सफाई, शिक्षण, जलसिंचन, जंगले व वनखाते, रस्ते व पूल, अंतर्गत व्यापार, कायदा व सुव्यवस्था, न्यायदान इत्यादी कार्ये दिलेली आहेत. तसेच राज्य व केंद्र सरकारने एकत्रित करण्याची कार्ये सामाईक सूचीत आहेत. त्यांत आर्थिक व सामाजिक नियोजन, फौजदारी कायदा, औद्योगिक व कामगार कलह, उच्चशिक्षण, सामाजिक सुरक्षा व विमा, किंमत नियंत्रण इत्यादींचा समावेश आहे.

घटनेने सोपविलेली ही कार्ये कार्यक्षमतेने पार पाडता यावीत म्हणून केंद्र व राज्य सरकारांमध्ये कर उत्पन्नाचे न्याय्य वाटपदेखील करण्यात आले. व्यापक व वर्धिष्णू स्वरूप असलेले कर केंद्राकडे, तर स्थानिक स्वरूपाचे कर राज्यांकडे देण्यात आलेले आहेत. वित्तीय साधनांच्या वाटपाची योजना कितीही आदर्श स्वरूपाची असली, तरी सर्व कालखंडाच्या दृष्टीने ती अंतिम स्वरूपाची ठरू शकत नाही. त्यात समन्वय असावा म्हणून भारतीय संविधानाच्या कलम २८० अनुसार वित्त आयोगाची रचना करण्यात आली आहे. सामान्यत: दर पाच वर्षांनी राष्ट्रपती वित्त आयोगाची नेमणूक करतात; तथापि आवश्यकता वाटल्यास राष्ट्रपती पाच वर्षांच्या कालावधी पूर्वीही नवा वित्त आयोग नेमू शकतात. वित्त आयोगात अध्यक्षांसमवेत पाच सदस्य असतात. त्यांच्या निवडीची अर्हता संसदेला कायद्याद्वारे कलम २८० (२) अनुसार ठरविता येते. घटनेतील तरतुदींनुसार पहिला वित्त आयोग २० नोव्हेंबर १९५१ मध्ये श्री. के. सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला.

**वित्त आयोगाचे स्वरूप व कार्यपद्धती :** भारताच्या संघराज्य वित्त व्यवस्थेत केंद्राचे वर्चस्व आणि त्यामुळे प्राप्त होणारा हस्तक्षेपाचा अधिकार, कर आकारणीत परस्परसहकार्य, घटनेचे सार्वभौमत्व इ. वैशिष्ट्ये दिसून येत आहेत. त्याचप्रमाणे या व्यवस्थेत स्वतंत्रता, समन्यायता, पर्याप्तता, हस्तांतरण इत्यादी मार्गदर्शक तत्त्वे अनुस्यूत आहेत. प्रत्येक घटक राज्याचा आकार, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व सामाजिक प्रश्न हे विभिन्न असतात. त्यामुळे सर्व राज्यांना एकसमान वाटपाचे तत्त्व लावता येत नाही. अशा स्थितीत वित्तीय विभाजनाचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. त्याचे वित्तीय समायोजन करणे हे सर्वच वित्त आयोगांसमोरील आव्हान असल्याचे दिसून येते. विविध राज्यांतील प्रादेशिक असमतोलामुळे उत्पन्नाच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न निर्माण होतो. तसेच केंद्रस्थानी एका पक्षाचे व राज्यामध्ये अन्य पक्षांची सरकारे असतील, तर संघर्षाचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता असते. संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेत केंद्राकडे उत्पन्नाची बहुतांश साधने असून ती लवचिक असतात; तशी ती राज्यांकडे नसल्याने केंद्राकडे आर्थिक केंद्रीकरण होण्याची शक्यता असते. या सर्व बाबींचा विचार करून वित्त आयोग कामकाज व शिफारशी करतो. राज्याराज्यांमध्ये महसुलाबाबत अनुचित स्पर्धा असू नये, अशी व्यवस्था करण्याचे कामही वित्त आयोगाकडे अप्रत्यक्षपणे असते. (संदर्भ - https://marathivishwakosh.org/5201/)

**पंधरावा वित्त आयोग ( XV-FC किंवा 15-FC ) हा** नोव्हेंबर 2017 मध्ये स्थापन करण्यात आलेला एक भारतीय वित्त आयोग आहे आणि 2020-04-01 पासून सुरू होणाऱ्या पाच आर्थिक वर्षांसाठी कर आणि इतर वित्तीय बाबींच्या हस्तांतरणासाठी शिफारसी देणार आहे. आयोगाचे अध्यक्ष नंद किशोर सिंह आहेत, भारत सरकारने 2017-11-27 रोजी *भारताच्या राजपत्रातील* अधिसूचनेद्वारे - भारताच्या राष्ट्रपतींकडून औपचारिक मान्यता घेतल्यानंतर - पंधराव्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाचे अध्यक्ष म्हणून नंद किशोर सिंग यांची नियुक्ती करण्यात आली, त्यांचे पूर्णवेळ सदस्य शक्तीकांत दास आणि अनूप सिंग आणि अर्धवेळ सदस्य रमेश चंद आणि अशोक लाहिरी होते. 1 एप्रिल 2020 पासून सुरू होणाऱ्या पाच आर्थिक वर्षांसाठी कर आणि इतर आर्थिक बाबींच्या हस्तांतरणासाठी शिफारसी देण्यासाठी आयोगाची स्थापना करण्यात आली होती. आयोगाची मुख्य कार्ये "सहकारी संघराज्य बळकट करणे, जनतेची गुणवत्ता सुधारणे" ही होती.

- 15 वा वित्त आयोग **स्थापना** २७ नोव्हेंबर २०१७ ला
- **कार्यकाल** २०२० ते २०२५ पर्यंत
- **अध्यक्ष** नंद किशोर शिंग आहे
- **सदस्य** अजय नारायण झा आणि डॉ.अनुप सिंह
- **अशकालीन सदस्य** डॉ.अशोक लाहिरी आणि डॉ.रमेश चंद
- **सचिव** श्री .अरविंद मेहता तसेच
- **राज्यामध्ये वाटा कर महसुलाच** ४१ %(१ % जम्मू काश्मीरसाठी )

| घटक | भर |
|---|---|
| लोकसंख्या (२०११ ) | १५ % |
| राजकोषीय शिस्त | २.५ % |
| क्षेत्रफळ | १५ % |
| वन आणि पर्यावरणशास्त्र | १० % |
| लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी | १२.५ % |
| राजकोषीय क्षमता किवा उत्तपन अंतर | ४५ % |

## सर्वाधिक रक्कम कोणत्या राज्याला

| राज्य | किती % |
|---|---|
| १)उत्तरप्रदेश | १७.९३९% |
| २)बिहार | १०.०५८ % |
| ३)मध्यप्रदेश | ७.८५०% |
| ४) पश्चिम बंगला | ७.५२३ |
| ५)महाराष्ट्र | ६.३१७% |

## सर्वात कमी रक्कम कोणत्या राज्यला

| राज्य | किती % |
|---|---|
| १)गोवा | ०.३८६ % |
| २)सिक्कीम | ०.३८८ % |
| ३)मिझोरम | ०.५०० |
| ४)नागालँड | ०.५६९ % |